कडधान्य आत्मनिर्भरता अभियानांतर्गत (TRFA कडधान्य सह) सर्वसाधारण प्रवर्गासाठी केंद्र शासनाने Mother Sanction द्वारे मंजूर केलेला केंद्र व समरुप राज्य हिस्सा पुनर्विनियोजनाद्वारे उपलब्ध करुन देणेबाबत.

**महाराष्ट्र शासन**
**कृषी, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : पूरक-२०२५/प्र.क्र.१६१/४-अे**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक,
मंत्रालय विस्तार, मुंबई- ४०० ०३२.
दिनांक: २० मार्च, २०२६

वाचा:-

१. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.राअपोसुअ -२०२५/प्र.क्र.५७/४-अे, दि.०६/०५/२०२५.
२. कृषि व पदुम विभागाचा शासन निर्णय क्र.संकीर्ण -२०२५/प्र.क्र.१७०/४-अे, दि.२७/११/२०२५.
३. केंद्र शासनाचे पत्र क्र. ७३५ (MH-७०३), दि.२३/०२/२०२६.
४. कृषि आयुक्तालयाचे पत्र जा.क्र.विप्र-१/कड आत्म अभि २५-२६/पूरक मागणी/प्र.क्र.०७/२-२७८/२०२६, दि.०२/०३/२०२६.

**प्रस्तावना:**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानसाठी रू.३१३८०.०६८५ लाख (प्रलंबित दायित्वासह) रकमेच्या आराखडयास वाचा येथिल अनु. क्र.१, दि.०६/०५/२०२५ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केली आहे. त्यामध्ये कडधान्य पिकांसाठी रु. १४३.७१३०६ कोटी इतकी तरतूद करण्यात आली आहे. केंद्र शासनाच्या सूचनांनुसार, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियानांतर्गत कडधान्य पिकाच्या मूळ प्रशासकीय मंजूरीपैकी, सद्यस्थितीत शिल्लक असणाऱ्या कार्यक्रमातून रब्बी हंगामापासून कडधान्य आत्मनिर्भरता अभियान राबविण्यात आले असून दि.२७/११/२०२५ अन्वये सदर अभियानास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली आहे.

सदर अभियानांतर्गत केंद्र शासनाने वाचा येथिल अनु क्र.३ अन्वये Mother Sanction मंजूर केले आहे. त्यानुसार, कृषि आयुक्तालयाच्या मागणीप्रमाणे, राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत सर्वसाधारण प्रवर्गाच्या लेखाशीर्षामधून कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाच्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या लेखाशीर्षाखाली केंद्र व समरुप राज्य हिश्श्याची एकूण रु.२८.२४ कोटी इतकी तरतूद पुनर्विनियोजनाद्वारे वितरित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय:**

राष्ट्रीय अन्न सुरक्षा आणि पोषण अभियान अंतर्गत, सर्वसाधारण प्रवर्गाच्या केंद्र हिश्याच्या २४०१ ४६१४ या लेखाशीर्षामधून कडधान्य आत्मनिर्भरता अभियानाच्या सर्वसाधारण प्रवर्गाच्या २४०१ B७४२ या लेखाशीर्षाखाली, रु.१६.९४ कोटी, तसेच, राज्य हिश्श्याच्या २४०१ A२३४ या

लेखाशीर्षामधून कडधान्य आत्मनिर्भरता अभियान सर्वसाधारण प्रवर्गाच्या २४०१ B७५१ या लेखाशीर्षाखाली समरुप राज्य हिस्सा रु.११.२९ कोटी असा एकूण रु.२८.२४ कोटी निधी पुनर्विनियोजनाद्वारे वितरित व खर्च करण्यास खालीलप्रमाणे शासन मंजूरी देण्यात येत आहे.

(रु. लाखात)

| **अ.क्र** | **कृषी उन्नती योजनेंतर्गत SLS चे नाव** | **प्रवर्ग** | **केंद्र/राज्य (६०:४०)** | **लेखाशीर्ष (३३ अर्थसहाय्य)** | पुनर्विनियोजन |
|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ९ |
| १ | MH-१० NFSNM | **सर्वसाधारण** | केंद्र | २४०१४६१४ | -१६९४.८४५०० |
| | | | राज्य | २४०१A२३४ | -११२९.८९६६७ |
| | | | **एकूण** | ---- | **-२८२४.७४१६७** |
| २ | MH-७०३ Mission for Aatmnirbharta in PULSES | **सर्वसाधारण** | केंद्र | २४०१B७४२ | १६९४.८४५०० |
| | | | राज्य | २४०१B७५१ | ११२९.८९६६७ |
| | | | **एकूण** | ---- | **२८२४.७४१६७** |

२. या शासन निर्णयान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेल्या निधीचा तात्काळ विनियोग करण्यात यावा तसेच, निधी विनियोगाच्या अनुषंगाने संचालक (विस्तार व प्रशिक्षण) यांनी वेळोवेळी उपयोगिता प्रमाणपत्र शासनास सादर करावे.

३. या शासन निर्णयान्वये वितरीत निधी खर्च करताना, महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिका व वित्तीय अधिकार नियम पुस्तिकेमध्ये उल्लेख केलेल्या, तसेच, नियोजन विभाग व वित्त विभागाने निर्गमित केलेल्या मार्गदर्शक सूचना, प्रचलित अटी व शर्तीचे तसेच वेळोवेळी दिलेल्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

४. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौ.सं.क्र.१५५/२०२६/व्यय-१, दि.१७/०३/२०२६ अन्वये दिलेल्या सहमतीस अनुसरून निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०३२०१५१९२२३८०१ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,**

RUCHITA RANJAN PIMPLE

Digitally signed by RUCHITA RANJAN PIMPLE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=AGRICULTURE AND ADF DEPARTMENT, 2.5.4.20=4D2E14E1B5B622285A319D549438716BC45686280AAC03BEA60829E714C19298, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=7E83BB07DDF0C67032F513E6336E3EE49F53DC047998C7012096DD9C8059D5FE, cn=RUCHITA RANJAN PIMPLE
Date: 2026.03.20 15:55:36 +05'30'

**(रुचिता पिंपळे)**

**कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन**

**प्रती:-**

१) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

२) मा. राज्यमंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई
४) अपर मुख्य सचिव (नियोजन), नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
५) अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई
६) अपर मुख्य सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई
७) आयुक्त (कृषि), कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
८) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य बियाणे महामंडळ, अकोला.
९) संचालक (विस्तार व प्रशिक्षण), कृषि आयुक्तालय, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे.
१०) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
११) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
१२) महालेखाकार ( स्थानिक निकाय लेखा परिक्षा व लेखा), मुंबई.
१३) महालेखापाल (लेखा परिक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१४) महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता) महाराष्ट्र १/२, मुंबई/नागपुर
१५) सर्व जिल्हा कोषागार अधिकारी, महाराष्ट्र राज्य
१६) सहायक संचालक (लेखा-१), कृषि आयुक्तालय, पुणे
१७) वित्त विभाग (कार्या. व्यय-१ / अर्थसंकल्प - १३), मंत्रालय, मुंबई
१८) निवड नस्ती.